**वस्त्रोद्योग धोरण २०११-२०१७ अंतर्गत**
**व्याज सवलत अनुदान वितरीत करणेबाबत**
**डि-डेकॉर होम फ्रॅब्रिक्स प्रा. लि., जिल्हा ठाणे**

# महाराष्ट्र शासन

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक धोरण-२०१३/प्र.क्र.१३३/टेक्स-२**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक : १४ ऑक्टोबर, २०१३**

**वाचा :-** १. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण-२०१२/ प्र.क्र.१/टेक्स-२ दिनांक १ मार्च, २०१२

२. शासन शुदीपत्र, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण-२०१२/ प्र.क्र.१/टेक्स-२ दिनांक १२ मार्च, २०१२, दिनांक १९/७/१२ व १३/८/१२

३. संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांचे पत्र क्र.६३५१, दिनांक ६ जुलै, २०१३ चे पत्र.

**प्रस्तावना :-**

वरील संदर्भीय अनुक्रमांक १ येथील दिनांक १ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याचे नवीन वस्त्रोद्योग धोरणांतर्गत केंद्र पुरस्कृत TUF योजनेशी निगडीत दीर्घ मुदती कर्जावरील व्याज सवलत योजना जाहिर करण्यात आली आहे. सदर योजेनेअंतर्गत **डि-डेकॉर होम फ्रॅब्रिक्स प्रा. लि. , जिल्हा ठाणे** या वस्त्रोद्योग घटकास व्याज सवलत अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील वस्त्रोद्योग धोरण २०११-२०१७ अंतर्गत केंद्र पुरस्कृत TUFS योजनेशी निगडीत दीर्घ मुदती कर्जावरील व्याज सवलत योजनेअंतर्गत **डि-डेकॉर होम फ्रॅब्रिक्स प्रा. लि., जिल्हा ठाणे** या वस्त्रोद्योग घटकास दिनांक २१/६/११ ते दिनांक ३१/१२/१२ या कालावधीतील अ.क्र.१ ते ७ त्रैमासिकासाठी अनुज्ञेय व्याज सवलतीच्या रक्कमेपोटी खालीलप्रमाणे एकूण रु १,८१,८३,०००/- ( रुपये एक कोटी एक्याऐंशी लाख त्र्याऐंशी हजार फक्त) इतकी रक्कम मंजूर करुन वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | व्याज सवलत त्रैमासिकाचा कालावधी | व्याज सवलत त्रैमासिकाचा क्रमांक | व्याज सवलतीची प्रस्तावित रक्कम |
|---|---|---|---|
| १ | दि.२१/६/११ ते ३०/६/११ | १ | ००.०० |
| २ | दि.१/७/११ ते ३०/०९/११ | २ | ००.०० |
| ३ | दि.१/१०/११ ते ३१/१२/११ | ३ | ००.०० |
| ४ | दि.०१/०१/१२ ते ३१/०३/१२ (प्रत्यक्ष अनुज्ञेय दि.१/३/१२ ते ३१/३/१२ ) | ४ | रु.१८,४९,०००/- |
| | दि.१/४/१२ ते ३०/६/१२ | ५ | रु.५३,८८,०००/- |
| | दि.१/७/१२ ते ३०/९/१२ | ६ | रु.५४,७३,०००/- |
| | दि.१/१०/१२ ते ३१/१२/१२ | ७ | रु.५४,७३,०००/- |
| | **एकूण** | | **रु.१,८१,८३,०००/-** |

२. **डि-डेकॉर होम फ्रॅब्रिक्स प्रा. लि., जिल्हा ठाणे** या वस्त्रोद्योग घटकास वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली रक्कम योजनेच्या दिशानिर्देशानुसार सदर रक्कम **युनियन बँक ऑफ इंडिया** यांचे खालील नमूद खात्यावर R.T.G.S. द्वारे वितरीत करण्यात यावी :-

**Bank Name :- Union Bank of India**

**IFSC :- UBIN0537896**

**A/c No. :- 378901010036988**

३. **डि-डेकॉर होम फ्रॅब्रिक्स प्रा. लि., जिल्हा ठाणे** यांना मंजूर करण्यात आलेली व्याज सवलतीची उपरोक्त रक्कम **युनियन बँक ऑफ इंडिया** यांनी सदर वस्त्रोद्योग घटकास वितरीत करुन त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

४. वरील प्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम संबधित बँकेस वितरीत करण्याकरीता श्रीमती अ.अ.चूरी , कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच श्री. र.मो. आडे, उप सचिव , सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी या आदेशाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम अधिदान व लेखाअधिकारी , मुंबई येथून आहरीत करुन **Union Bank of India, IFSC :- UBIN0537896 , A/c No. :- 378901010036988** यांना वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

५.	यावर होणारा खर्च " मागणी क्रमांक व्ही-२ २८५१- ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११०, संमिश्र ग्रामोद्योग व लघुद्योग आणि सहकारी संस्था (दोन) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२)(६४) केंद्र पुरस्कृत टफ (TUF) योजनेशी संबंधित वस्त्रोद्योग प्रकल्पासाठी दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याजासाठी अर्थसहाय्य योजना (२८५१५९८१) दत्तमत ३३, अर्थसहाय्य " या लेखाशिर्षाखाली सन २०१३-१४ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

६.	सदर शासन निर्णय, नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचे अनुक्रमे अनौपचारीक संदर्भ क्रमांक ११४/१४३१, दि.२५.७.२०१३ व क्रमांक ४७३/१३/व्यय-२ दिनांक ३.१०.२०१३ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**( र. मो. आडे )**
**महाराष्ट्र शासनाचे उप सचिव**

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव.
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री / राज्यमंत्री (वस्त्रोद्योग)(खाजगी सचिवामार्फत), मंत्रालय,मुंबई.
नियोजन विभाग/(कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई
वित्त विभागा/(व्यय-२), मंत्रालय, मुंबई
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१/२, मुंबई/ नागपूर
महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर
संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
कार्यासन अधिकारी (रोखशाखा (३ प्रती/ कार्यासन -१७ स)
अध्यक्ष, डेकॉर होम फ्रॅब्रिक्स प्रा. लि., एफ-६,/१-२, एम.आय.डी.सी. बोईसर, जिल्हा ठाणे.
युनियन बँक ऑफ इंडिया,२३९, युनियन बँक भवन,४था मजला,विधानभवन मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई.
निवड नस्ती (टेक्स-२)